# नशीबाचा कौल . . .

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित

वसंतऋतूचे आगमन होऊ लागले होते, सैनिकांचा थकलेला हा समूह क्योटो या राजधानीच्या शहराबाहेरच्या परिसरात विश्रांती घेत होता. त्यांच्या त्या छोट्याशा छावणीच्या आजूबाजूला सर्वत्र 'साकूरा'ची झाडे होती, जी नुकतीच फुलांनी बहरू लागली होती. फिकट गुलाबी रंगाची फूले — ज्यांना चेरी ब्लॉसमस् असे म्हणतात — फांद्यांमधून डोकावून पाहत एका तात्पुरत्या शांततेचा देखावा प्रस्तुत करत होती.

एके दिवशी सकाळी, त्या सैनिकी गटाचा सेनापती यांपैकी एका 'साकूरा'च्या वृक्षाखाली बसून छावणीकडे पाहत होता. एक-एक करत त्याचे सैनिक झोपेतून जागे होत होते.  त्यांच्यापैकी एका सैनिकाने जाळ पेटलेलाच राहावा यासाठी सरपणाच्या काड्यांची मोळी आत लोटायचा प्रयत्न सुरू केला होता. इतर काही सैनिक अन्नपदार्थ शोधत होते.

ते एक फारच लांबलेले युद्ध होते, गेली अनेक वर्षे जपानच्या अनेक प्रांतांमध्ये लढले जात होते. त्यामुळे सैनिकांना मोजावी लागेली किंमत सेनापती निन्टोकू पाहू शकत होता. स्वतःच्या हालअपेष्टांचा उच्चारदेखील त्या सैनिकांनी कधी केला नव्हता, अगदी एकदाही नाही, पण त्याविषयीची जाण त्या सेनापतीला होती. तो पाहू शकत होता की, सैनिकांचे चेहरे कसे निस्तेज झाले होते; त्यांची पावले कशी मंद गतीने पडत होती, जडावली होती; युद्धभूमी सोडताच, त्यांचे खांदे कसे वाकून सैल पडले होते. एक काळ असा होता की, हेच सैनिक छाती फुगवून ताठ मानेने चालत होते. त्यांनी त्यांच्या विजयांची प्रौढी मिरवली होती आणि त्या शौर्यगाथांचीदेखील ज्या ते भविष्यात निश्चितपणे लिहिणार होते.

सैनिकांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी काय करता येईल याचा विचार करत सेनापती निन्टोकू तिथे बसला असतानाच, एक सैनिक धावतपळत त्याच्या दिशेने आला.

"सेनापती!" दम लागल्यामुळे वाकून आपले हात गुडघ्यांवर ठेवत तो सैनिक म्हणाला. "तुमच्यासाठी राजवाड्यातून एक संदेश आहे." एक लांबट आकाराचे, बारीकसे पाकिट त्याने सेनापतीपुढे धरले.

सेनापतीने सैनिकाच्या हातातून ते पाकिट घेतले आणि आतील कागद उलगडला. त्या कागदावर एक संदेश लिहिलेला होता, जो त्यावरील सुव्यवस्थित, ठळक आणि सफाईदार हस्ताक्षराच्या अगदी विरूद्ध होता. सेनापतीने जेव्हा त्यावरील मजकूर वाचून संपवला, तेव्हा क्षणभर थांबून तो शून्यात पाहत राहिला. सूर्योदय जवळजवळ झालेलाच होता. सूर्याच्या हलक्या नारिंगी रंगाच्या प्रकाशाने वृक्ष चमकत होते आणि तो प्रदेश उन्हाच्या रंगाने रंगून गेला होता.

"सेनापती?" सैनिक अनुमान लावत म्हणाला. "काय झाले?"

सेनापती क्षणभर शांत राहिला. त्याच्या डोक्यावर असणाऱ्या फांदीवरून चेरी ब्लॉसम्स्चे एक फूल वाऱ्याच्या झूळकेने तुटून त्याच्या मांडीवर येऊन पडले. त्याच्या कोमल पाकळ्यांचे निरीक्षण करत, त्याने ते वर उचलले. त्या पाकळ्या सफेद रंगाच्या होत्या, परंतु त्यांत कुठे-कुठे लाल रंगाच्या शिरा दिसत होत्या.

सेनापती निन्टोकू त्या सैनिकाकडे पाहत म्हणाला, "आपल्याला लवकरच पुन्हा युद्धभूमीवर परतायला हवे." "शत्रू उत्तरेकडून चढाई करतो आहे. सैनिकांच्या अनेक तुकड्यांसह शत्रू येतो आहे."

"किती तुकड्या?" सैनिकाने विचारले.

"आपल्या पायदळातील सैनिकांपेक्षा तीन पट जास्त. आणि आपल्याकडे असलेल्या घोडदळातील सैनिकांच्या दुप्पट."

"आपण काही जादा सैनिकांची कुमक मागवू शकतो का?"

"हो, आपण मागवू शकतो, पण ते वेळेत पोहोचणार नाहीत."

"मग काय करू शकतो आपण?"

"आपण लढू," सेनापती अगदी साधेपणाने म्हणाला. असे म्हणून तो उठून उभा राहिला, त्याने ते पत्र आपल्या अंगरख्यात ठेवले आणि सैनिकांच्या छावणीकडे जाणाऱ्या रस्त्यावरून त्याने चालायला सुरुवात केली.

सैनिकाचा तो प्रश्न सेनापतीच्या मनात रेंगाळतच राहिला. काय ‘करणार’ होते ते? त्याचे सैनिक कितीही जरी शूरपणे लढले, तरी ते त्यांच्या शत्रूला जर पळवून लावू शकले नाहीत, तर राजधानीचे ते शहर शत्रूच्या ताब्यात जाणार होते.

सेनापती काही वेळ चालत राहिला, शेवटी एका कोपऱ्यावर वळत असताना त्याच्यासमोर एक उठावदार लाल रंगाची कमान असलेले ‘तोरीद्वार’ दिसून आले. [जपानमध्ये मंदिराच्या प्रवेशद्वाराला तोरीगेट म्हणतात.] ते एका मंदिराचे प्रवेशद्वार होते. त्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना दोन दगडी संरक्षक कुत्रे होते, एकाचे तोंड उघडे होते तर दुसऱ्याचे बंद होते. ते दिसायला कितीही जरी भयावह असले, तरीदेखील का कुणास ठाऊक, ते सेनापतीला आत येण्यासाठी खुणावत आहेत असे वाटत होते.

सेनापती निन्टोकू दरवाजातून मंदिराच्या आत गेला. तो पूजावेदीपर्यंत पोहोचताच, नमस्कारासाठी वाकला, त्याने जमिनीवर डोके टेकवले. नंतर काही वेळ तो गुडघे टेकून बसून राहिला. मंदिरातील शांतता त्याच्या शरीराच्या कणाकणांत भिनत जाऊन, त्याच्या हृदयाजवळच्या जागेत स्थिरावल्यामुळे त्याचे डोळे आपोआपच मिटले गेले होते. त्याच्या अंतरातून स्वाभाविकतेने ही प्रार्थना स्फुरली. त्याने आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी सामर्थ्य आणि प्रज्ञान मागितले, ज्यामुळे हे सुनिश्चित व्हावे की शहर सद्यस्थितीत तसेच चिरकाल सुरक्षित राहील. त्याने असेही आशीर्वाद मागितले की, त्याच्या सैनिकांची त्यांच्या स्वतःच्या कुटुंबियांशी पुन्हा भेट व्हावी.

तो अशी प्रार्थना करत असतानाच त्याला कशाचातरी आवाज ऐकू आला : एक आवाज, जो सुरुवातीला अस्पष्ट होता आणि मग मोठा होत गेला. तो त्याच्या पाठीमागून कुठुनतरी येत होता. एखादी धातूची वस्तू पडल्याचा तो आवाज होता.

त्याने डोळे उघडले आणि तो आवाज कुठुन आला हे लवकरच त्याला समजले. ते एक नाणे होते, जे आनंदाने जमिनीवर घरंगळत येत होते. आणि जिथे सेनापती गुडघ्यावर वाकून बसला होता तिथे पोहोचताच त्या नाण्याची गती कमी झाली, छाप्याची बाजू वर येईल अशा रितीने पडत असतानाच ते उधळत होते — *खण्ण्णन्* — शेवटी एकदाचे ते नाणे जमिनीवर पडले.

सेनापतीने आजूबाजूला पाहिले. त्या मंदिरात त्याच्या व्यतिरिक्त अजुन कुणीही उपस्थित नव्हते. त्याने ते नाणे उचलले आणि आपल्या हातावर उलटवले. काही काळ उत्सुकतेने त्या नाण्याचे निरीक्षण केले. आणि अगदी सावकाश, त्याच्या चेहऱ्यावर एक स्मितहास्य पसरले.

***

थोड्या वेळानंतर, सेनापती निन्टोकू जेव्हा छावणीवर परतला, तेव्हा त्याने त्याच्या सैनिकांना एकत्रित केले आणि त्यांना जवळ येऊन ठेपलेल्या युद्धाविषयीची माहिती दिली. सैनिकांनी आपल्या चेहऱ्यावर कोणतेही भाव न दर्शवता ती बातमी संयमितपणे ऐकून घेतली, पण सेनापतीने निश्चितपणे हे जाणले होते की, ते चिंतातूर झाले होते. त्यांचे डोळे विस्फारले होते; ते गप्प-गप्प झाले होते.

"मला कल्पना आहे की, तुम्ही काय विचार करता आहात," सेनापती निन्टोकू म्हणाला. "पण नशीब नेहमीच दिसते तसे नसते. आता हे नाणेच पाहा?"

मंदिरात सापडलेले ते नाणे त्याने वर उचलून दाखवले.

"शेजारीच असलेल्या मंदिरात मी जेव्हा प्रार्थना करत होतो, तेव्हा हे नाणे माझ्याकडे आले. मला खात्री आहे की, हा एक संकेत आहे."

"एक संकेत?" त्यांच्यापैकी एकाने विचारले. "तो कसा काय, सेनापती?"

"अस बघा, आपल्या पूर्वजांच्या काळातील आपले सेनाध्यक्ष काय करत असत याची कल्पना तुम्हाला आहे."

सैनिक एकमेकांकडे पाहू लागले, त्यांचे चेहरे निर्विकार होते.

"नाही सेनापती," शेवटी ते म्हणाले. "आम्हाला काहीच कल्पना नाही."

"मी सांगतो," सेनापती निन्टोकू म्हणाला. "कोणत्याही मोठ्या युद्धापूर्वी, सेनाध्यक्ष त्यांच्या सैनिकांना आपल्याभोवती गोळा करत — जसे आज तुम्ही सर्वजण गोळा झाले आहात. मग सेनाध्यक्ष एक नाणे घेत, शक्यतो ते नाणे, ज्याला जवळपासच्या एखाद्या मंदिरातून किंवा दर्ग्यातून आशीर्वादित करून घेतलेले असे. अगदी तसेच, जसे हे नाणे आत्ता माझ्या हातात आहे."

सेनापती काही वेळ थांबला.

"आणि मग?" एक सैनिक उत्सुकतेने मध्येच बोलला. "मग पुढे काय?"

“मग सेनाध्यक्ष त्याच्या सैनिकांना सांगत असे, ‘जवानांनो! मी हे नाणे हवेत फेकणार आहे. ते खाली पडल्यावर त्यावरील छाप्याची बाजू जर वर आली, तर त्याचा अर्थ असेल की, आपण विजयी होऊ.’ आणि प्रत्येक वेळी छाप्याची बाजूच वर असायची — कोणत्याही प्रकारची प्रतिकूलता असली तरी किंवा शत्रू त्यांच्याहून संख्येने कितीही जरी जास्त असला तरी — युद्ध तेच जिंकत असत.”

“काय?” “नाही — हे खरे आहे का?” “प्रत्येक वेळी?” सैनिकांना आश्चर्याचा धक्काच बसला होता.

“होय,” सेनापती निन्टोकू म्हणाले. “प्रत्येक वेळी. तेव्हा आता, मी माझ्या हातातील हे नाणे वर फेकणार आहे. आणि माझे म्हणणे लक्षात ठेवा, जर त्या नाण्याची छाप्याची बाजू वर आली, तर आपण विजयी होऊ, जसे आपल्यापूर्वी होऊन गेलेले आपले पूर्वज विजयी होत असत अगदी तसेच.”

सेनापतीने ते नाणे अंगठा आणि अंगठ्याजवळच्या बोटात धरले. ते व्यवस्थित पाहता यावे यासाठी सैनिक जवळ सरकले. त्यांची उत्सुकता — त्यांची आशा, त्यांची यावर विश्वास ठेवण्याची इच्छा की कदाचित, फक्त कदाचित, त्यांचे नशीब पूर्वनिर्धारित नसणार — यामुळे त्यांच्या सर्व शंका दूर झाल्या होत्या.

सेनापती निन्टोकू यांनी आपल्या बोटांच्या टिचकीने ते नाणे हवेत उंच भिरकावले. ते उंच, उंच, उंच गेले, भिरभिरत झाडाच्या सर्वात उंच फांदीच्या शेंड्यांच्या वर. प्रत्येकजण त्याकडे टक लावून पाहत होता; हालचाल तर सोडाच, पण त्यांचे श्वाससुद्धा रोखले गेले होते.

शेवटी, युग लोटली गेल्याचा भास करवून देणाऱ्या त्या वेळेनंतर, गुरुत्वाकर्षणाने त्या नाण्याला खाली आणले आणि ते सेनापतीच्या उघड्या तळव्यावर येऊन पडले. सेनापतीने त्याकडे नजर वळवली, त्याचा चेहरा गंभीर होता. नंतर त्याने वर पाहिले.

“छापा,” ते म्हणाले.

क्षणभरासाठी, सर्व काही स्थिर, शांत झाले होते. आणि मग — हर्षोल्लास, आनंद ओसंडून वाहू लागला. टाळ्यांचा कडकडाटाने वातावरण गुंजायमान झाले. सैनिकांनी एकमेकांना मिठ्या मारल्या, स्वतःची छाती ठोकत, मुठी आवळून त्यांनी आकाशाच्या दिशेने आपले हात उंचावले. अचानक, सर्व काही शक्य झाले होते. विजय दृष्टिपथात होता.

नवीनतम ऊर्जेने घेरले जाऊन, त्यांनी युद्धासाठी कूच केले. शत्रूच्या तुकड्यांचे गट सुसाट वेगाने त्यांच्या दिशेने येताना पाहूनदेखील ते नाउमेद झाले नाहीत आणि ना ते परावृत्त झाले. शत्रूला नियंत्रणात ठेवण्यासाठी त्यांनी सर्व रणनीतींचा अवलंब केला. ते अशा निपुणतेने आणि आक्रमकतेने लढले की, अशी आक्रमकता आपल्या अंगी आहे याची त्यांना जाणीवही नव्हती. आणि बघता, बघता, दिवसाच्या अखेरीस — त्यांच्या शत्रूने पराभव स्वीकारला.

सेनापती निन्टोकू 'साकूरा'च्या वृक्षांजवळ असलेल्या त्याच्या स्थानावरून शत्रूला पलायन करताना पाहत होता. आकाश पुन्हा एकदा नारिंगी झाले होते, सूर्य त्याचे दिवसभराचे कार्य पार पाडून अस्ताला निघाला होता.

अगदी त्याचवेळी, जवळपासच्या जागेत कुठेतरी थोडीशी हालचाल झाली. सेनापतीने वळून पाहिले असता एक सैनिक त्याच्या दिशेने येत होता — तोच सैनिक ज्याने अगोदरही राजवाड्यातून आलेला संदेश त्याच्यापर्यंत पोहोचवला होता.

"सेनापती," सैनिक म्हणाला. "माझा आपल्या नशीबावर विश्वासच बसत नाही! परमेश्वराचे आभारच आहेत की, त्या नाण्याची छापा असलेली बाजू वरच्या बाजूला होती."

"होय, खरेच आहे," सेनापती निन्टोकू म्हणाला. "आपले नशीब खरेच खूप चांगले आहे."

"हे घे," क्षणभरानंतर तो म्हणाला. "मला वाटते की, हे तू तुझ्याकडे राहू द्यावे." त्याने ते नाणे सैनिकाला दिले, ज्याने ते काळजीपूर्वक स्वतःच्या ओंजळीत घेतले.

"नशीबाचे स्मरणचिन्ह, तू तुझ्या हातात धरून ठेवावेस यासाठी," सेनापती निन्टोकू म्हणाला, त्याने त्या सैनिकाच्या पाठीवर थोपटले आणि तो तिथून निघून गेला.

सैनिकाने त्या नाण्याकडे नजर वळवली, त्या नाण्याच्या पृष्ठभागावरील छापा दिवसाच्या अखेरच्या किरणांनी चमकत होता. त्याने ते उलटले. पुन्हा एकदा, नाण्याच्या पृष्ठभागावरचा छापा सूर्याच्या किरणांनी चमकू लागला होता.

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.